**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत उद्या संपणार

- प्रमुख पक्षांच्या अनेक उमेदवारांचे अर्ज दाखल

- इंडिया आघाडीमध्ये प्रधानमंत्री पदाबाबत अजून चर्चा झालेली नसल्याचा शरद पवार यांचं प्रतिपादन, तर राहुल गांधी प्रधानमंत्री होतील असा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा दावा

**आणि**

- कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक क्षेत्रात उष्णतेची लाट येण्याची शक्यता

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत उद्या संपणार आहे. त्यामुळं अर्ज भरण्याची लगबग उमेदवारांमध्ये सुरू आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार अमोल कीर्तिकर यांनी मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातून, तर कांग्रेसचे भूषण पाटील यांनी मुंबई उत्तर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत शिवसेना नेते अनिल परब आणि माजी मंत्री

असलम शेख यांच्यासह महाविकास आघाडीतले हजारो कार्यकर्ते उपस्थित होते. आयात केलेला उमेदवार आणि स्थानिक उमेदवार अशी ही लढाई असल्याचं भूषण पाटील यांनी यावेळी बोलताना सांगितलं. तर अमोल कीर्तिकारांचा विजय केवळ जाहीर व्हायचा राहिला आहे, असं अनिल परब म्हणाले. मुंबई उत्तर मतदारसंघातून आज पाच उमेदवारांनी अर्ज दाखल केले.

**कल्याण डोंबिवली** लोकसभा मतदारसंघातले महायुतीचे उमेदवार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी काढलेल्या प्रचंड रॅलीमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री रविंद्र चव्हाण, मनसे आमदार राजू पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे आनंद परांजपे आणि महायुतीतल्या मित्र पक्षांचे पदाधिकारी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

पाच लाखांच्या मताधिक्यानं डॉ. श्रीकांत शिंदे निवडून येतील आणि पाच वर्ष सेवा करतील, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

**पालघर** लोकसभा मतदारसंघासाठी आज महाविकास आघाडीच्या उमेदवार भारती कामडी यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून आपला उमेदवारी अर्ज आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीत दाखल केला. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार सुनील भुसारा, कम्युनिस्ट पक्षाचे आमदार विनोद निकोले आदी उपस्थित होते. यावेळी ढोलताश्यांच्या

गजरात मोठ्या संख्येने एकत्रित येवून महाविकास आघाडीचं शक्ती प्रदर्शन करत आज भारती कामडी यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

**दिंडोरी लोकसभा** मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाच्या डॉ. भारती प्रविण पवार यांनी आज उमेदवारी अर्ज भरला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, आमदार डॉ. राहुल आहेर, सुहास कांदे इत्यादी नेते उपस्थित होते.

दिंडोरी लोकसभा मतदारसंघातून बहुजन रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टीच्या वतीनं भारत पवार यांनीही आज अर्ज भरला.

दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे भाजपाचे माजी खासदार हरिश्चंद्र चव्हाण यांनी बंडखोरी करत दिंडोरी लोकसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी दाखल केली आहे.

**नाशिक** लोकसभा मतदारसंघातले शिवसेनेचे उमेदवार खासदार हेमंत गोडसे यांनी आज शक्तिप्रदर्शन करुन आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी झालेल्या मिरवणुकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, छगन भुजबळ, गिरीश महाजन, संजय शिरसाठ, नरहरी झिरवळ इत्यादी सहभागी झाले होते.

**धुळे** लोकसभा मतदार संघासाठी आज भीमसेना या पक्षाच्या वतीनं मुकीमुद्दीन शेख यांनी नामनिर्देशन पत्र दाखल केलं.

ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक पार्टीचे उमेदवार शिवाजी पाटील यांनी आज धुळे लोकसभा मतदारसंघासाठी आपला उमेदवारी अर्ज भरला.

<><><><><>

नंदुरबारमध्ये डॉ हिना गावित यांच्या प्रचारासाठी येत्या ७ मे रोजी प्रधानमंत्री मोदी प्रचारसभा घेणार असून या सभेला १ लाखाहून अधिक लोकांची गर्दी होईल असं भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. जिल्ह्यातल्या भाजपा पदाधिकाऱ्यांच्या आज झालेल्या नमो संवाद बैठकीत ते बोलत होते. स्थानिक पातळीवर पक्ष कार्यकर्त्यांमधले मतभेद आता मिटले असल्याचा दावा त्यांनी केला.

<><><><><>

आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेस तयार असेल तर एकत्र निवडणूक लढवण्याची इच्छा वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केली आहे. ते आज लातूरमध्ये वंचित आघाडीचे उमेदवार नरसिंग उदगीरकर यांच्या प्रचारासाठी आले असता बातमीदारांशी बोलत होते.

भाजपा-शिवसेनेचं लुटुपुटुचं भांडण सुरु आहे. लोकसभा निवडणुकीनंतर भाजपासोबत जाणार नाही याची खात्री उद्धव ठाकरे यांनी अद्याप महाराष्ट्राला दिलेली नाही, असं ते म्हणाले.

<><><><><>

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण नंदूरबार लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी

सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><>**

इंडिया आघाडीमध्ये प्रधानमंत्री पदाबाबत अजून चर्चा झालेली नाही. पुरेसं संख्याबळ आल्यावर निर्णय घेतला जाईल. त्यामुळं इंडिया आघाडी अस्थिर सरकार देईल असा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा दावा चुकीचा असल्याचं शरद पवार यांनी कोल्हापुरातल्या पत्रकार परिषदेत आज सांगितलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वर्तवणुकीवरही त्यांनी नाराजी व्यक्त केली. तरुणांचाही त्यांच्यापेक्षा आम्हाला जास्त प्रतिसाद मिळत असल्याचा दावा त्यांनी केला. राज्यातल्या लोकसभा निवडणुका ५ टप्प्यात घेण्यावरही त्यांनी नाराजी व्यक्त केली. सत्ताधारी पक्षाला अधिकाधिक ठिकाणी प्रचाराची संधी मिळावी म्हणून जाणीवपूर्वक राज्यातली निवडणूक लांबवल्याचा आरोप त्यांनी केला.

दरम्यान, इंडिया आघाडीची सत्ता आल्यावर राहुल गांधी प्रधानमंत्री होतील असा दावा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी काल लातूरमध्ये केला. महाविकास आघाडीचे उमेदवार राज्यातल्या सर्व जागांवर विजयी होतील, असंही ते म्हणाले.

**<><><><>**

सध्याच्या प्रधानमंत्र्यांना स्वातंत्र्यचळवळीची कोणतीही पार्श्वभूमी नाही परंतु ते नेहरूंवर टीका करत असतात, असा आरोप **राष्ट्रवादी काँग्रेस**

**पक्षाचे** नेते शरद पवार यांनी केला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सांगलीचे उमेदवार चंद्रहार पाटील यांच्या प्रचारसभेत ते आज बोलत होते. सध्याचं सरकार लोकशाही राज्यामध्ये अनेकांना कारण नसताना तुरुंगात टाकत आहे. देशाच्या भविष्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून आणलं पाहिजे असं आवाहन शरद पवार यांनी केलं.

गेल्या दहा वर्षांत सांगलीच्या खासदारांनी काम केलं असत तर आत्ता योगी आदित्यनाथ आणि अमित शाह यांना सभा घ्याव्या लागल्या नसत्या, असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत या सभेत म्हणाले.

**-<><><><><>**

महायुतीचे अहमदनगरचे उमेदवार सुजय विखे यांच्या प्रचारासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या ७ मे रोजी सावेडी इथे सभा घेतील अशी माहिती भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग यांनी दिली आहे. प्रधानमंत्री मोदी यांची सभा नगरमध्ये ६ मे रोजी होणार होती. मात्र त्यांचा महाराष्ट्र दौरा एक दिवस पुढे ढकलल्याने ही सभा आता ७ मे रोजी होणार आहे.

**<><><><><>**

नवी मुंबईतले भाजपाचे माजी नगरसेवक आणि पदाधिकारी अशा सुमारे ६४ जणांनी आपले राजीनामे पक्षाचे माजी सभागृह नेते रविंद्र इथापे यांच्याकडे सादर केले आहेत. महायुतीचे ठाण्याचे उमेदवार नरेश म्हस्के यांनी ऐरोलीचे आमदार गणेश नाईक यांची आज भेट घेतली. त्यांच्यबरोबर

आमदार रवींद्र फाटक , आमदार प्रताप सरनाईक आणि भाजपा ठाणे शहर जिल्हा अध्यक्ष संजय वाघुले उपस्थित होते. ही बैठक सुरु असतानाच दुसरीकडे हे राजीनामे देण्यात आले.

**<><><><><>**

जालना जिल्ह्यातल्या रस्त्याच्या विकासाकरता आपण शासनाकडून सहा हजार कोटींचा निधी आणला असल्याचं महायुतीचे उमेदवार रावसाहेब दानवे यांनी म्हटलं आहे. जालना जिल्ह्यात रामनगर इथं आज झालेल्या प्रचारसभेत ते बोलत होते. दरम्यान, आज दानवे यांच्या जालना शहरातल्या मध्यवर्ती प्रचार कार्यालयाच उदघाटन पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत झालं.

**<><><><><>**

जाहिरातींद्वारे, सर्वेक्षणाद्वारे किंवा ॲप्सच्या माध्यमातून निवडणुकीनंतरच्या लाभार्थी केंद्रित योजनांसाठी नावनोंदणी करण्याच्या कृती तात्काळ बंद करण्याचे आदेश निवडणूक आयोगानं आज सर्व राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय राजकीय पक्षांना दिले. अशा कोणत्याही भविष्यकालीन योजनांसाठी नावनोंदणी करण्यामुळे मतदारांना प्रलोभनं दाखवली जाऊन निवडणुक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. अशा जाहिराती

दिसल्यास जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यावर योग्य ती कारवाई करावी, असे निर्देश निवडणूक आयोगानं दिले आहेत.

<><><><><>

सोलापूर जिल्ह्यातल्या ३ हजार ६१७ मतदान केंद्रावरच्या स्वच्छता मोहीमेला आज सुरुवात झाली. सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी बोरामणी इथल्या मतदान केंद्र परिसरात स्वतः हातात झाडू घेऊन या स्वच्छता मोहिमेला सुरुवात केली. या मोहिमेत ग्रामीण भागातल्या २ हजार ३६१, तर शहरी भागातल्या १ हजार २५६ मतदान केंद्रावर ही स्वच्छता मोहीम राबवली जाणार आहे.

<><><><><>

महिला क्रिकेटमधे, आज बांगलादेशात सिल्हट इथं झालेल्या तिसऱ्या टी-ट्वेंटी सामन्यात भारतानं बांगलादेशावर ७ गडी राखून विजय मिळवला. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला, आणि बांगलादेशाचा डाव ८ बाद ११७ धावांवर रोखला. स्मृती मंधना, शेफाली वर्मा, यांनी दिलेल्या ९१ धावांच्या भागीदारीमुळे भारतानं विजयी लक्ष्य २ गड्यांच्या मोबदल्यात १९ व्या षटकातच पार केलं. शेफालीनं ५१, तर स्मृती मंधनानं ४७ धावा केल्या.

<><><><><>

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही जिल्ह्यांमध्ये तुरळक क्षेत्रात उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली

आहे. पालघर, ठाणे , मुंबई, रायगड मध्ये हवामान कोरडं राहील. कोकणातील तुरळक क्षेत्रात हवामान उष्ण आणि दमट राहील, तर मराठवाड्यातल्या तुरळक ठिकाणी रात्री उष्णता वाढेल असा वेधशाळेचा अंदाज आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैदराबाद आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना होणार आहे. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर थोड्याच वेळात म्हणजे साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

सनरायझर्स हैदराबादनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला.

**//<><><><><>//**